Ex. 8/B

दि. कि. अर्ज नं. २४/२०२६

# मे. जिल्हा न्यायाधिशसो कोल्हापूर यांचे कोर्टात -

Seen & filed
P.D.J. Kop
16-3-26

श्री. आदगोंडा आण्णा पाटील, वगैरे ) अर्जदार

वि रु ध्द

श्री. अनमोल आदगोंडा पाटील ) वि. प.

यातील वि. प. तर्फे अर्जदार यांनी सी. पी. सी. कलम २४ प्रमाणे दिले अर्जास म्हणणे असे की -

१) अर्जदारचा अर्ज प्रस्तुत वि. प. यांना मान्य व कबुल नाही व तो कायदेशीर नाही. सबब चालणेस पात्र नाही.

२) अर्जातील कलम १(अ) ते (ड) मध्ये वर्णन केलेल्या मिळकतींचे वर्णन सर्वसाधारण बरोबर आहे.

३) अर्जातील कलम २ यातील, ''असे असताना फक्त प्रतिवादी यांना त्रास व्हावा म्हणुन जयसिंगपुर कोर्टामध्ये दावा दाखल केला आहे.'' . . . . . . हा मजकुर तसेच, ''तरीही प्रतिवादी यांना त्रास

16/3/26

देणेसाठी जयसिंगपुर कोर्टामध्ये दावा दाखल केलेला आहे.'' हा मजकुर धादांत खोटा असुन तो वि. प. यांना मान्य व कबुल नाही.

४) अर्जातील कलम ३ यातील मजकुर चुकीचा आहे. तो वि.प. यांना मान्य व कबुल नाही.

५) अर्जातील कलम ४ मध्ये मागितलेल्या दादी कायदयाविरूध्द आहेत. त्या मंजुर करता येणार नाहीत.

६) वस्तुतः अर्जदार यांनी खोटा व खोडसाळ अर्ज दाखल केला आहे. वि. प. हा अर्जदार यांचा दत्तक मुलगा आहे. उभय अर्जदार यांनी जैन धर्मशास्त्र व रूढी रितीरिवाजाप्रमाणे व पुर्वापार चालत आलेल्या रूढरितीरिवाजाप्रमाणे दि. ३०/०६/२०२० रोजी सकाळी ७ ते १० या वेळेत श्री. शितल बाळासो कलाजे (पंडीत) यांनी केलेल्या दत्त विधीप्रमाणे दत्तक विधी पुर्ण करून वि. प. यांना त्यांचे जनक आई - वडिलांकडून दत्तक घेतले आहेत. तसेच वि. प. यांचा अर्जदार यांनी दत्तक मुलगा म्हणुन स्विकारही केला आहे. दत्तक विधीवेळी दत्तक मुलगा मांडीवर बसवुन टाळू हुंगणे, आलेल्या पै - पाहुण्यांना पान सुपारी देणे, जेवण देणे, वगैरे गोष्टी पध्दतीप्रमाणे केलेल्या आहेत. त्यानंतर दि.०१/०७/२०२० रोजी नोंद क्र. २५५३ ने सदरचे दत्तकपत्र साक्षीदारांच्या साक्षीने अर्जदार यांनी रजिस्टरही केले आहेत. अशा रितीने वि. प. हा अर्जदार यांचा कायदेशीर दत्तक मुलगा आहे.

16/3/26
Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.

७) वि. प. हा दत्तक गेला त्यासुमारास शितल केटकाळे औद्योगिक प्रशिक्षण केंद्र शिरोळ येथे शिक्षण घेत होता. त्यांचे शिक्षणाचे नुकसान होवु नये म्हणुन अर्जदार यांनीच त्याला वर नमुद शाळेत शिक्षणासाठी घातले. तथापि कोल्हापूर ते शिरोळ याचे अंतर येता जाता १०० किलोमिटर असलेमुळे जाण्या - येण्याचा त्रास होवु नये व वेळ वाया जावु नये या हेतुने वि. प. याला अर्जदार यांनीच त्यांचे जनक आई- वडिलांचे घरी मौजे आलास, ता. शिरोळ येथे ठेवले. मौजे आलास हे गाव वि. प. शिक्षण घेत असलेल्या शिरोळ पासुन येता - जाता १६ किलोमिटर इतके होते.

८) वरीलप्रमाणे वस्तुस्थिती असता यातील अर्जदार यांनी गैरबुध्दीने व इतरांचे शिकवणुकीवरून वि. प. यांचे नुकसान करणेचे हेतुने मे. सिव्हिल सिनीअर डिव्हिजन कोल्हापूर यांचे कोटात रे. क. नं. ८८०/२०२२ चा हक्कज्ञापनाचा दावा वि. प. व त्यांचे जनक आई - वडिलांविरूध्द दाखल करून दत्तकपत्र हे पोकळ व निरर्थक असल्याचे हक्कज्ञापन मागितले. तो दावा गुणदोषावर चालुन दि. १६/०४/२०२५ इ. रोजी नामंजुर झालेला आहे. त्यानंतर प्रस्तुत अर्जदार हे अर्जात नमुद मिळकती या त्यांचे नांवे नोंद असल्याचा गैरफायदा घेवुन व वि.प. याला त्या मिळु नयेत या हेतुने त्यांची विक्री अथवा अन्य मार्गाने तबदिली करण्याचा प्रयत्न करून लागल्याने वि. प. यांनी मे. सिव्हिल जज्ज सिनिअर डिव्हिजन जयसिंगपुर यांचे कोर्टात रे. क.नं. ४१/२०२५ चा

16/3/26
stant Superintendent

दावा वाटपाकरीता दाखल केला आहे. दरम्यानचे काळात दावा सुरु असताना अर्जदार यांनी दावा गट नं. ४९१ ची दावा मिळकत तबदिलीही केली आहे.

९) वरील प्रमाणे अर्जदार यांचे वर्तन पाहता निव्वळ वि. प. यांना त्रास देणे करिता अर्जदार यांनी सदरचा अर्ज दाखल केल्याचे स्पष्ट होते. अर्जदारचा हेतु प्रामाणिकपणाचा नाही. अर्जदार स्वच्छ हाताने न्याय मागण्या करिता आलेले आहे. अर्जदार नं. १ व २ यांना प्रवास करणे व हिंडणे फिरणे अशक्य असल्याबाबत अर्जदार यांनी केलेली कथने धादांत खोटी आहेत. अर्जदार नं. १ व २ हे जयसिंगपुर न्यायालयातील तारखेस हजर राहु शकतात. त्यांना कोणतीही अडचण नाही. जयसिंगपुर न्यायालयातील दावा हा नि. ५ चौकशीवर असून सदरचा कलम २४ चा अर्ज देऊन त्यांची चौकशी लांबवणे व दरम्यान दावा मिळकतींची तबदिली करणे व गुंतागुंत वाढविणे हाच हेतु अर्जदार यांचा आहे. थोडक्यात अर्जदार यांचा अर्ज प्रामाणिकपणाचा नाही. अर्जदार यांचे वर्तणही पाहणे गरजेचे आहे. यांचा विचार करता अर्ज मंजुर करता येणार नाही.

१०) अर्जदारांच्या अर्जास कोणतेही समर्पक कारण नाही याचा ही विचार करता अर्ज नामंजुर होणेस पात्र आहे.

16/3/26

Assistant Superintendent

११) प्रस्तुत वि. प. हा सध्या महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीत कंत्राटी ऑपरेटर म्हणुन कवठेगुलंद, ता. शिरोळ येथे काम करतो. त्यामुळे प्रस्तुत वि. प. याला नोकरी करत जयसिंगपुर येथील तारखेस हजर राहणे शक्य होते. जयसिंगपुर – आलास याचे अंतर १७ कि. मी. इतके आहे. याउलट अर्जदार सदरचा दावा वर्ग करून मागतात त्याप्रमाणे कोल्हापूर न्यायालयात वर्ग झालेस वि. प. यांना जाऊन येऊन १२० कि. मी. इतके अंतराचे हेलपाटे लागणार आहेत. त्यामुळे वि. प. यांचे नोकरीचे नुकसान होणार आहे. याचा ही विचार करता अर्ज नामंजुर होणेस पात्र आहे.

१२) जरूर तर ज्यादा म्हणणे देणेस अगर म्हणणे दुरूस्तीस परवानगी असावी.

-------

येणेप्रमाणे कारणांचा विचार करून अर्जदार यांचा अर्ज खर्चासह नामंजुर करण्यात यावा अशी विनंती आहे.

मे. जाहीर व्हावे,

ता. १६/०३/२०२६

---------------

## ॲ फि डे व्ही ट

मी श्री. अनमोल आदगोंडा पाटील, व. व. २३, धंदा नोकरी, रा. आलास, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर ॲफिडेव्हीट करतो की –

१) मी यातील वि.प. आहे.

२) वरील अर्जातील सर्व मजकूर खरा व बरोबर आहे.

-----

म्हणून केले ॲफिडेव्हीट,
मे. जाहीर व्हावे,
ता. १६/०३/२०२६

मी ॲफिडेव्हीद करणारेस ओळखतो–

(श्री. अरुण डी. कल्लणणावर)
ॲडव्होकेट – कुरूंदवाड

## प्र ति ज्ञा

मी श्री. अनमोल आदगोंडा पाटील, व. व. २३, धंदा नोकरी, रा. आलास, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर अशी सत्य प्रतिज्ञा करतो की, वरील अर्ज व ॲफिडेव्हीट मधील सर्व मजकूर माझे स्वतःच्या माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे, म्हणून केली प्रतिज्ञा, ता. म. सदर

Solemnly Affirmed before me by
Shri. Anmol Adgonda Patil - 23
of R/o Allas Tal Shirol whose
identified by Shri. A.D. Kallannavar
............whom I know personally
Dated :- 16/3/2026

Assistant Superintendent
Kurundwad.